माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य, माहिती आयोग खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ८२७/२०२१,**

**अपिलार्थी, श्री. रमण शिवशंकर सोनटक्के,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,**
**सक्करदरा विभाग, नागपूर शहर**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,**
**परिमंडळ क्र. ४ अजनी, नागपूर**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.०१.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.११.२०२० | ३.१२.२०२० | १३.०१.२०२१ | १६.०२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३.११.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " सक्करदरा पोलीस स्टेशन नागपूर जा.क्र.३३४/२०२० दि. ३१.१०.२०२० रोजीच्या पत्रानुसार पो.उपनि. पी. एस. धडे यांच्या घेतलेल्या बयाणाची प्रमाणित प्रत देण्यात यावी आणि जप्त व गोळा केलेले संपूर्ण दस्ताऐवज, कागदपत्रे संबंधित संपूर्ण माहिती पुरावे प्रमाणित प्रत देण्यात यावे व इतर अनुषंगिक २ मुद्यांची माहिती मागितली आहे ."

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि.०३.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये, अर्जात नमूद केलेली माहिती पोलीस स्टेशन सक्करदाराशी संबंधीत असल्याने संबधील पोलीस स्टेशनला पत्रव्यवहार करून पोलीस स्टेशन सक्करदरा यांनी या कार्यालयास सादर केलेली माहिती या पत्रासह पुरविण्यात येत आहे, असे कळविले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक १३.०१.२०२१ रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "माहिती चूकीची देण्यात आली असल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले.

त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून आदेशात जनमाहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, सक्करदरा विभाग, नागपूर शहर यांनी अभिलेखावरील उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना पुरविल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर प्रथम अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे, असे आदेशीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १५.०३.२०२१** रोजी " मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १६.०१.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, सक्करदरा विभाग, नागपूर शहर श्री. पुंडलिक एन. भटकर उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ४ अजनी, नागपूर श्री. विजयकांत सागर उपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आज झालेल्या सुनावणी दरम्यान सादर कागदपत्राचे अवलोकन व उपस्थितांचे युक्तिवाद विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जानुषंगाने जोडपत्र-अ नुसार सक्करदरा पोलीस स्टेश नागपूर जा.क्र.३३४/२०२० दि. ३१.१०.२०२० रोजीच्या पत्रानुसार पो.उपनि. पी. एस. धडे यांच्या घेतलेल्या बयाणाची प्रमाणित प्रत देण्यात यावी आणि जप्त व गोळा केलेले संपूर्ण दस्ताऐवज, कागदपत्रे संबंधित संपूर्ण माहिती पुरावे प्रमाणित प्रत देण्यात यावे व इतर अनुषंगिक २ मुद्यांची माहिती मागितली आहे. संबंधित तक्रार अर्जात अर्जदार श्री. सोनटक्के यांनी भाग्यश्री कॉ. ऑफ हाऊसिंग सोसायटी सक्करदारा, नागपुर शहर या सहकारी संस्था येथे सदस्यत्व शुल्क संबंधित संस्थेमार्फत वितरीत होणाऱ्या भूखंड वितरणासाठी प्रदान केलेली रक्कम व त्यानंतर संस्थेमार्फत सदर भुखंड त्यांना प्रदान करण्यात आले असून कथित संदर्भात असे आढळून येते. याबाबत तत्कालिन जनमाहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त सक्करदरा विभाग नागपूर शहर यांनी माहिती अर्जानुसार अपिलार्थी यांना दि. ०३.१२.२०२० रोजी करण्यात आलेल्या चौकशीत गैरअर्जदारास दिलेल्या सूचनापत्राची प्रत, गैरअर्जदाराचे बयानाच्या प्रती, अर्जदार यांना दिलेल्या सयुक्ती उत्तराची प्रत व अर्ज चौकशी अहवालाची प्रत पुरविली असल्याचे सादर केलेल्या खुलासावरून आढळून येते.त्याविरुध्द दाखल प्रथम अपिल अर्जाच्या सुनावणीत तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त पोलीस मंडळ क्र. ४, नागपूर शहर यांच्या वतीने अपिल अर्ज निकाली काढत असतांना उपलब्ध असलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम कलम २ च नुसार पुरविण्यात आली असून यात सुस्पष्टपणे नमूद केले आहे.

अपिलार्थी यांनी अपिल अर्जाच्या सुनावणीत पुरविलेली माहिती अपूर्ण असल्याचे आक्षेप नोंदविला आहे. मात्र जनमाहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, सक्करदारा, नागपूर शहर यांनी अभिलेखात उपलब्ध् असलेली माहिती पुरविली असल्याचे सुस्पष्ट नमूद केले आहे. त्याविरुध्द दाखल व्दितीय अर्जात अपिलार्थी यांना माहिती अपूर्ण मिळाली असून त्यांचे तक्रार अर्जावर देखील असमाधान कारवाई करण्यात आली असल्याचे नमूद केले आहे. तसेच तत्कालिन पोलीस उपनिरीक्षक श्री. पी. एस. धडे, सक्कदरा पोलीस स्टेश नागपूर यांनी अपिलार्थी यांच्या तक्रार अर्जावर आदेश दिले असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे मुळात तशी चौकशीच्या पद्धतीने चुकीच्या काही, अपराध दृष्ट हेतूने त्रास होत असल्याचा आक्षेप देखील त्यांनी नोंदविला आहे. संबंधित गृहनिर्माण संस्थेचा तपशिल बाबत कायदेशीररित्या भुखंड वाटप केले असल्यास शासनाची दिशाभूल करीत



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग सत्यमेव जयते ★नागपूर★

असल्यामुळे वरील प्रकरणाची चौकशी तसेच माहिती अधिकार कायद्याचे उल्लघंन केले असल्यास शास्ती कारवाईची मागणी केली असल्याचे तक्रार अर्जात नोंद आहे.

सादर केलेल्या खुलासात तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांच्या वतीने अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासाच्या चौकशी अहवाल हा विहीत मुदतीत सादर करण्यात आला असून संबंधित तक्रार अर्जात अपिलार्थी हे संस्थेत सदस्य असतांना संस्थेमध्ये वेगवेगळे असे एकूण रु. २६,०००/- रक्कम सोसायटीमध्ये नगदी स्वरुपात भरली असल्याचे दिसून येत आहे व ते सोसायटीच्या बँक खात्यात जमा असून वरील प्रकरणात दिवाणी प्रकरण असल्यास अर्जदारास समन्स दिला असल्याचे यात नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी दाखल केलेला तक्रार अर्ज, व्दितीय अपिल अर्जात त्यांना माहिती अधिकारातंर्गत गैरअर्जदार त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याचा आदेश असून वरील माहिती माहिती अधिकार अधिनियमाच्या कार्यकक्षेच्या बाहेर आहे. सादर माहिती अर्जानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती कलम २ च नुसार अपिलार्थी यांना विहीत मुदतीत प्रतिसाद देणे अपेक्षित आहे. माहिती अधिकार अधिनियमाचे पालन करण्याची मुख्य जबाबदारी जनमाहिती अधिकारी यांच्या वतीने तसेच जबाबदार पोलीस प्रशासनाच्या वतीने विहीत मुदतीत झाले असल्याचे लक्षात येते. तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी देखील विहीत मुदतीत सुनावणी घेवून त्यावर सविस्तर आदेश पारित केले आहे. अपिलार्थी यांनी व्दितीय अपिल अर्जात नमूद केल्याप्रमाणे तत्कालिन पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ४ नागपूर शहर हे तपास अधिकारी असून तक्रार अर्जावर पुनश्च: तपास करण्याचे मौखिक आदेश देखील दिले असल्याचे नमूद केले आहे. ही बाब लक्षात घेता, अपिलार्थी यांना जोडपत्र-अ नुसार अपेक्षित माहिती अभिलेखावर उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती त्यांना याआधीच प्रदान केली आहे. अपिलार्थी यांनी केलेल्या तक्रार अर्जात त्यांचे म्हणण्यानुसार सुनावणी दरम्यान तपासाचे मौखिक आदेश पारित केले असल्यामुळे वरील व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे, या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक :१६.०१.२०२३**

जावक क्रमांक 2560 ---------- दिनांक 25 APR 2023